**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**
Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360

क्र.माराशुश्रुवपशि/परिक्षा /३०० /२०१८ दिनांक:- २३/०९/२०१८

प्रति,
सर्व परिक्षा केंद्र प्रमुख,
ए.एन.एम/जी.एन.एम., सप्टेंबर २०१८ परिक्षा,
महाराष्ट्र राज्य.

विषय:- २५ सप्टेंबर २०१८ पासून सुरु होणा-या ए.एन.एम/जी.एन.एम परिक्षेसाठी स्थानिक पोलीस स्टेशन मधून पोलीस संरक्षण मागवून घेण्याबाबत.

संदर्भ:- एन.जी.ओ.(नॉन गव्हरमेंट ऑरगनायझेशन) नर्सिंग असोसिएशन, महाराष्ट्र राज्य या संघटनेतर्फे सोशल मिडीयावर फिरत असलेले त्यांचे दिनांक २१/०९/२०१८ चे पत्र क्र. NGONA/1058/2018.

या कार्यालयास वरिल संदर्भीय पत्राची प्रत काहि विद्यार्थ्याकडून प्राप्त झालेली आहे.(प्रत सोबत जोडली आहे) सदर पत्रामध्ये संघटनेने केलेल्या आव्हानाबाबत विद्यार्थी व पालक यांचेकडून या कार्यालयाकडे वारंवार विचारणा करण्यात येत आहे. या बाबत विचारणा केलेल्या विद्यार्थ्यांना परिक्षा सुरळीत पार पडतील असे सांगण्यात आलेले आहे.

सदर संघटनेचे आव्हान पाहता, परिक्षेस बसू इच्छिना-या विद्यार्थ्यांना परिक्षेस न बसण्याबाबत त्या विद्यार्थ्यांवर दबाव येण्याची शक्यता आहे. त्यामूळे परिक्षा केंद्राभोवती कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. यास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि आपण याबाबत स्थानिक पोलीस स्टेशनला लेखी पत्र लिहून या परिक्षेसाठी पोलीस संरक्षण मागवून घ्यावे. परिक्षेस बसणा-या एकूण विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण पाहता जास्त महिला पोलीस पाठविण्याबाबत पोलीस स्टेशनला विनंती करावी.

sd/-
संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण

स्थापना : ३/०९/२०१०
रजि. नं. F-२२१३४ (सो)

# एन.जी.ओ. (नॉन गव्हरमेंट ऑरगनायझेशन) नर्सिंग असोसिएशन, महाराष्ट्र राज्य

मुख्य कार्यालय : जी-२०३, ए.पी.एस.सी. मार्केट यार्ड, फळ विभाग, तुर्भे, नवी मुंबई-४००७०५

website : www.ngonursingassociation.com E-mail : maharashtranursingassociation@gmail.com

जावक क्र. : NGONA/1058/2018 दिनांक : 21/09/2018

## जाहीर नोटीस

महाराष्ट्रातील सर्व ANM व GNM नर्सिंग अभ्यासक्रम चालवणाऱ्या महाविद्यालयाच्या संस्थाचालक / प्राचार्य / संचालक व तेथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते कि महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाची बेकायदेशीररित्या कैंद्र सरकारची मान्यता (Gazzette Of Notification) न घेता, तसेच लोकसभा व राज्यसभेची मान्यता न घेता, तशी अधिसूचना कैंद्र सरकारच्या प्रेस मध्ये जाहीर न करता अस्तित्वात आणली आहे. त्यामुळे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई येथे त्यांची नोंदणी (Resgistration) करता येणार नाही याची नोंद घ्यावी व त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. तरी सर्व विद्यार्थी / पालक / संचालक / प्राचार्य यांनी याची गंभीर दखल घेऊन या २५/०९/२०१८ पासून सुरु होणाऱ्या परीक्षेवर बहिष्कार टाकावा व कोणी त्या परीक्षेस बसू नये. तसेच सन २०१७-१८ साठी महाराष्ट्र परिचर्या परिषदेने महाविद्यालयांना मान्यता व संलग्नीकरण दिलेले असून मंडळ जबरदस्तीने बेकायदेशीर परीक्षा घेण्याचा प्रयत्न करत आहे. जर भविष्यात विद्यार्थ्यांचे नुकसान झाले तर महाराष्ट्रातील आमच्या संघटनेचे सभासद असलेले सर्व संस्था याला जबाबदार राहणार नाहीत व याला जबाबदार हे फक्त महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळच राहील. असे या नोटीसीद्वारे सर्वांना कळविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

एन.जी.ओ. नर्सिंग असोसिएशन
महाराष्ट्र राज्य.

मरासुपरिम

टीप :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा फायदा मिळणार नाही.